## शिक्षक परिषद संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १५/११/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मागिल सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | मागिल सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. | -- | -- |
| २ | मागील सहविचार सभेत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे. | -- | -- | -- |
| ३ | सहविचार सभांचे आयोजन प्रभाविपणे व परिणामकारक पध्दतीने करणेबाबत | -- | -- | -- |
| | अ) प्रथम विभागीय स्तरावरील त्रैमासिक सहविचार सभांचे आयोजन नियमितपणे केले जावे. | विभागीय स्तरावर सुध्दा त्रैमासिक सभांचे आयोजन करण्यात यावे. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| | ब) मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक व प्राथमिक स्वतंत्रपणे) स्तरावरील सभांचे आयोजनही नियमितपणे व्हावे. | शिक्षणाधिकरी (माध्यमिक व प्राथमिक) स्तरावरील त्रैमासिक सभांचे आयोजन नियमितपणे करावे. | शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) स्तरावर | -- |
| | क) मा. गटशिक्षणाधिकारी स्तरावरही सहविचार सभांचे आयोजन करण्याची पध्दती रुढ करावी. | -- | -- | -- |
| | ड) सभा संपन्नतेनंतर एका आठवड्यात इतिवृत्त देण्याबाबत संबंधीतांना आदेश व्हावेत. | सह विचार सभा झाल्यानंतर शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लघुलेखक यांनी सभांचे इतिवृत्त १५ दिवसांत पूर्ण करुन शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. | लघुलेखक स्तरावर | -- |
| ४ | प्रत्येक शिक्षक व शिक्षकेत्तरास त्यांचे मुख्याध्यापक कार्यालयातून | अधिक्षक, वेतन पथक यांनी डिसेंबर पेड जानेवारी च्या वेतनदेयकाबरोबर शाळेतील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता यादी, सेवापुस्तकाची दुय्यम प्रत, वैयक्तिक मान्यतेची प्रत, वरिष्ठ व निवडश्रेणी मान्यतेची प्रत, बदली मान्यता तसेच पदोन्नती आदेशाची प्रत मिळालेबाबत शाळा मुख्याध्यापकांकडून संबंधीत शिक्षकांची स्वाक्षरी असल्याचे प्रमाणपत्राची मागणी करावी. त्याशिवाय वेतन देयके स्विकारु नयेत. अशा सूचना शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना द्याव्यात. | शिक्षणाधिकरी/ वेतन पथक स्तरावर | -- |
| | अ) परिपूर्ण भरलेल्या सेवापुस्ताकाची दुय्यम प्रत. | | | |
| | ब) अद्ययावत केलेली सेवाज्येष्ठता यादीची प्रत | | | |
| | क) नेमणूक आदेशाची किमान सत्य प्रत | | | |
| | ड) वैयक्तिक मान्यतेची किमान सत्य प्रत | | | |
| | इ) वरिष्ठ व निवडश्रेणी मान्यतेची सत्य प्रत | | | |
| | फ) बदली मान्यतेची सत्य प्रत | | | |
| | ग) पदोन्नती आदेशाची तसेच संबंधीतातून मान्यतेची सत्य प्रत देणेबाबत आपल्या कार्यालयाकडून वेळोवेळी आदेश होवूनही मा. शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कोणतीही ठोस उपाययोजना | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | झालेली नाही. त्यासाठी पुढील त्रैमासिक सभेपूर्वी पुर्तता करण्याच्या कृतिकार्यक्रम आजच निश्चित केला जावा | | | |
| ५ | मा. शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून गेल्या पाच वर्षापासून विविध सबबी सांगून वेळकाढूपणा केला गेल्यामुळे - | भ.नि.नि. स्लिपाबाबत अधीक्षक, वेतन पथक यांनी लेखे पूर्ण करुन माहे-डिसेंबर २०१८ अखेर कार्यवाही पूर्ण करावी. शिक्षणाधिकारी यांनी तशा सूचना अधीक्षक, वेतन पथक यांना द्याव्यात. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| | अ) कोणत्याही जिल्ह्यात सन २०१७-१८ अखेरच्या पी.एफ.स्लीपा अद्याप मिळालेल्या नाहीत. इतकेच नव्हे त्या मागिल तीन चार वर्षापासूनचच्या स्लिपा मिळालेल्या नाहीत. | | | |
| | ब) वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी मान्यता प्रस्ताव सुध्दा वारंवार त्रुटी काढून प्रलंबित ठेवले जातात व अर्थपूर्ण व्यवहारासाठी काही लिपीक मंडळी शिक्षकांना आगतिक बनवितात. | शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव कशाप्रकारे तपासावेत याबाबतची चेकलिस्ट मे-२०१८ मध्ये कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याप्रमाणे सर्व शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी.<br>तसेच आपल्याकडील प्रलंबित प्रस्तावावर 'नागरिकांची सनद' यामध्ये दिलेल्या विहित कालमर्यादेनुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| | क) वैयक्तिक मान्यता वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव मान्यता इ. प्रस्तावांचा निपटाराही अर्थकारणाशी जोडला गोल आहे.<br>सारांश- यापूर्वी प्रत्येक प्रकारचा प्रस्ताव विहित नमुन्यात सर्व कागदपत्रासह कसा सादर करावा यांचे नमूने आपणांकडून सर्व जिल्हयाला पुरविलेले होते. त्यानुसार सर्व प्रस्तावांचा निपटारा दाखल तारखेपासून एक महिन्याल परदर्शी पध्दतीने करण्याचे आदेश व्हावेत. | | | |
| ६ | दिनांक २ मे २०१२ नंतर शिक्षक भरतीवर लादलेल्या बंदी आदेश वेळोवेळी शिथील करुन भरती पक्रिया राबविलेली होती. मात्र अनेक संस्थाचालकांनी बंदी आदेशास छेद देवून शालेय कामकाजाची निकड लक्षात घेता केलेल्या नेमणूकही न्यायीक प्रक्रियेतून नियमित केल्या गेल्या. मात्र काही संस्थांनी न्याय प्रक्रिया न अनुसरता नेमणूक केलेल्या व सध्या राबणाऱ्या शिक्षकांचे प्रस्ताव आपणाकडे दाखल केले आहेत किंवा दाखल करण्याच्या प्रयत्नात आहेत त्यांची माहिती संकलन करुन शासनास त्वरीत सादर करावी. | अशाप्रकारच्या अनधिकृत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती कार्यालय उपलब्ध करुन देऊ शकत नाही. | -- | -- |
| ७ | दिनांक १४ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी आपल्या विभागात एक वाक्यता दिसून येत नाही त्याबाबत योग्य उपाययोजना करावी. | सेवाज्येष्ठतेबाबत दि.१४/११/२०१७ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ८ | अतिरिक्त शिक्षक समायोजनानंतर पूर्वीच्या शाळेत रिक्त | अतिरिक्त शिक्षक समायोजनानंतर पूर्वीच्या आस्थापनेवर | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जागेवर नियुक्तीबाबत. | शिक्षकाच्या नियुक्तीबाबत संबंधीत शिक्षकांनी मूळ शाळेत समायोजनासाठी शिक्षणाधिकारी यांचेकडे विनंती अर्ज करावे व शिक्षणाधिकारी यांनी एम.ई.पी.एस. १९८१ मधील नियम क्र.२६ नुसार मूळ शाळेत पद रिक्त असल्यास शिक्षकांचे समायोजन करावे. | | |
| ९ | सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवानिवृत्तीचे प्रस्ताव मा. शिक्षणाधिकारी स्तरावर प्रलंबित आहेत. असे प्रस्ताव त्वरीत कार्यवाहीसाठी पुढे पाठविणे आवश्यक आहे. त्याचे नियोजन व्हावे. | सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवानिवृत्तीचे प्रस्ताव मा. शिक्षणाधिकारी यांनी सेवानिवृत्ती तारखेच्या सहा महिने आधी सादर करणेबाबत शाळा मुख्याध्यापक यांना सूचना निर्गमित कराव्यात. तसेच शिक्षणाधिकारी स्तरावर प्रलंबित असणाऱ्या प्रस्तावांवर त्वरित कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर